मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियानाचा आर्थिक अभ्यास

(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा -2015-16 ते 2019-20)

AN ECONOMIC STUDY OF JALYUKT SHIVAR ABHIYAN OF MARATHWADA REGION (SPECIAL REFERENCE : NANDED DISTRICT (2015-16 TO 2019-20)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत शाखेतील अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंध सारांश (Synopisi)

संशोधक

जनकवाडे शिवानंद तातेराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी.ई.विभुते

प्राचार्य

हावगी स्वामी महाविद्यालय उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च, 2018

मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियानाचा आर्थिक अभ्यास
(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा २०१५-१६ ते २०१९-२०)

प्रस्तावना :-

मानवाला जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, हवा यांच्या इतकीच पाणी ही महत्त्वाची गरज आहे. मानवी शरीर हे ७०% पाण्याचे व्यापलेले आहे. पाण्याच्या शरीरातील सर्व क्रिया पूर्ण करण्यासाठी उपयोग होतो. म्हणजे पाण्याशिवाय मानवी जीवन शून्य आहे. म्हणून पाण्याच्या योग्य व काटकसरीने उपयोग करणे आवश्यक आहे.

भारतात पूर्वी पर्जन्यमान आणि पाण्याची उपलब्धता याबाबत काही अपवाद वगळता फारशी अडचण येत नव्हती. परंतु सध्या पर्जन्यमानातील अनियमिततेमुळे पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. देशातील एकूण ५९३ जिल्ह्यापैकी २०० पेक्षा अधिक जिल्ह्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी घटली आहे. जगाच्या जमीनीपैकी २.४% जमीन व जागतीक लोकसंख्येच्या १६% लोकसंख्या भारताच्या वाट्यात आलेली आहे. भारतात वर्षातील ०३ महिने १० ते १२० सेमी पाऊस पडतो. पर्जन्यमान अनियमित असल्यामुळे काही वर्षापासून दरवर्षी १०० पेक्षा अधिक जिल्ह्यात दुष्काळ पडतो. भारतात उपलब्ध पाण्यापैकी ७४% पाणी शेती उद्योगासाठी १८% पाणी धरणात साठवणूक करून वीजनिर्मितीसाठी तर ८% पाणी घरगुती वापरासाठी वापरले जाते.

महाराष्ट्रात काही तालुके वगळता पाण्याची टंचाई व पाणी वापरातील चुकीच्या पध्दतीमुळे पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पिण्यासाठी लागणारे पाणी शेती उद्योग व इतर उपयोगासाठी लागणाऱ्या पाण्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. अपुऱ्या अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. राज्यात गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धते अभावी कोरवाडू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढऊतार दिसून येतो.

निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी ही परिस्थिती बदलण्यासाठी एकात्मीक पध्दतीने सर्व विभागांच्या समन्वयाने नियोजनबध्द आराखडा तयार करून जलसंधारणाचे कार्यक्रम राबविण्यास पिण्याचे पाणी व पिकास संरक्षीत सिंचन देण्याची व्यवस्था निश्चिपणे निर्माण करता येईल गेल्या काही वर्षात राज्यात पाणी अडविण्यासाठी व जिरविण्यासाठी जलसंधारपणाचे अनेक कार्यक्रम राबविल्यामुळे पाणी टंचाईवार काही प्रमाणात मात करण्यास मदत झाली आहे. या सर्व कार्यक्रामचे यश विचारात घेऊन जलयुक्त शिवार अभियान राज्य सकारने ०५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार दुष्काळाचा सामना करण्यासाठी सुरू केले व २०१९ पर्यंत महाराष्ट्रातील या योजनेची व्याप्ती १८०० गावापर्यंत न्यायाचे ठरविले आहे.

मराठवाड्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सुरू असलेल्या कामांनी वेग घेतला असला तरी आतापर्यंत विभागात या योजनेत ३४३ गावांमध्ये १००% कामे पूर्ण झाली आहेत. शिवारातील पाणी शिवरातच मुरविण्यासाठी आता पावसांची प्रतिक्षा आहे. गेल्या काही दिवसापासून लातूर-बीड, उस्मानाबाद या दुष्काळाने होरपळलेल्या जिल्ह्यामध्ये आवकाळी पावसाने हजेरी लावली या पावसातच जलयुक्त शिवार अभियानाच्या कामामध्ये पाणी साचण्यास सुरूवात झाली आहे. यामुळे सततच्या दुष्काळाने हैराण झालेल्या सर्व सामान्य नागरिकांच्या जलयुक्त शिवार अभियानाकडून अपेक्षा वाढल्या आहेत. मराठवाड्यात आतापर्यंत लातूर जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाचे सर्वोत्कृष्ट काम झाले आहे.

नांदेड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत पहिल्या टप्यात (२०१५-१६) निवडलेली गावे लोहा तालुक्यातील वडेपुरी, रिसनगांव, धावरी, उमरा, कलंबर (बु.) माळाकोळी इ. गावे निवडण्यात आली आहेत.

जलयुक्त शिवार अभियानाचे काही प्रमुख उद्देश :-

- पावसाचे पाणी शिवारातच आडविणे.
- भूगर्भातील पाणी पातळीत वाढ करणे.
- राज्यात सिंचन क्षेत्रात वाढ करून शेतीसाठी संरक्षित व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे सर्वांना पुरेसे पाणी उपलब्ध करण्याची शाश्वत निर्माण करणे.
- भूजल अधिनियमाची अंमलबजावणी करणे.
- विकेंद्रीत पाणी साठा निर्माण करणे.
- पाणी साठवून क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे.
- अस्तित्वात असलेली व निकामी झालेले बंधारे, गावतलाव, पाझरतलाव, सिमेंट बंधारे , आदि जलस्त्रोताची साठवण क्षमता वाढविणे.
- जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून पाणी साठा वाढविणे.
- पाण्याच्या ताळेबंधाबाबत आणि कार्यक्षम वापरण्याबात प्रभावी जनजागृती तसेच वृक्ष लागवडीस प्राधान्य देणे.
- अशा प्रकारे वरील उद्देश साध्य करण्यासाठी जलयुक्त शिवार या अभियानाचा एक साधन म्हणून उपयोग करण्यात येत आहे.

संशोधन विषयाची निवडः-

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहे. कृषी क्षेत्राचा विकास सिंचनाशी निगडीत आहे ज्याची निर्मिती झाल्यापासून गेल्या ५७ वर्षाचा लेखाजोखा केला असता सिंचन क्षेत्राचा विकास समतोल प्रमाणात झालेला नाही. स्वातंत्र्यानंतर राज्या-राज्यात सिंचन क्षेत्रात जी गुंतवणूक केली गेलेली आहे त्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. परंतु महाराष्ट्रात १७.५ टक्याच्या वर सिंचन क्षेत्र गेले नाही. थोडक्यात राज्याच्या निर्मिती नंतर १९६५, १९६६, १९७२, १९७९, २००२, २००९, २०१४, २०१५ आणि २०१६ या वर्षात महाराष्ट्राला भीषण अशा दुष्काळाला समोरे जावे लागले आहे. राज्यात वेळोवेळी पडलेल्या दुष्काळाचा विचार करून आणि त्यावर कायमस्वरूपी शास्वत उपाय सुचविण्यासाठी दिर्घकालीन शेतकऱ्यांना सुखावणारी योजना म्हणजे जलयुक्त शिवार अभियान होय. या अनुषंगाने महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग व त्यातील विशेषतः नांदेड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाचा अध्ययन करण्यासाठी (२०१५-१६ ते २०१९-२०) या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियानावर झालेल्या खर्चाचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियानातील कामाच्या पूर्णतेचा अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानावरील खर्चाचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानातील अपूर्ण व पूर्ण कामाचा अभ्यास करणे.

५) जलयुक्त शिवार अभियान आणि लोकसहभाग यांचा अभ्यास करणे.

६) जलयुक्त शिवार अभिान यशस्वीतेसाठी शिफारशी करणे.

गृहितकृत्ये :-

१) जलयुक्त शिवार अभियानात लोकसहभाग उत्तरोत्तर वाढत आहे.

२) मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियानात अपूर्ण कामाचे प्रमाण अधिक आहे.

३) मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियानावरील खर्चाचे प्रमाण वाढते आहे.

४) नांदेड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाच्या कामामुळे भुगर्भातील पाणी पातळीत वाढ झाली आहे.

संशोधन पध्दती :-

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग विशेषः नांदेड जिल्ह्यातील निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यात एकुण १६ तालुके आहेत त्यातील ज्या तालुक्यात जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत सर्वात जास्त कामे झाली आहेत ती तालुके नमुना निवडीच्या सहेतुक पध्दीनुसार चार तालुक्याची निवड करण्यात आली आहे ती तालुके अनुक्रमे हदगांव, लोहा, हिमायतनगर, कंधार अशी आहेत.

सामग्री संग्रह :-

सदरील संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या माहिती/तथ्यांच्या संकलनासाठी दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

सदरील संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभाग व त्यातील नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे त्यामुळे संबंधीत विषय हा मराठवाडा व नांदेड जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

प्रकरणांचा आराखडा :-

१) जलयुक्त शिवार अभियानाची पार्श्वभूमी

२) संशोधन साहित्याची सिंहलोकन व संशोधन पध्दती

३) मराठवाडा व नांदेड जिल्ह्याची भौगोलिक व आर्थिक स्थिती

४) मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियान

५) नांदेड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियान

६) निष्कर्ष आणि शिफारस

संदर्भग्रंथ सूची :-

१) उद्योजक मे २०१५ पृष्ठ २१

२) लोकराज्य, फेब्रुवारी, मार्च, ऑगस्ट २०१५

३) अर्थसंवाद, ऑक्टोबर, डिसेंबर, २०१५

४) दैनिक ॲग्रो वन व दैनिक सकाळचे विविध अंक

५) अर्थसंवाद जुलै-सप्टेंबर २०१६

६) महराष्ट्र शासनाचे विविध संकेतस्थळ

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी.ई. विभुते
प्राचार्य
हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

संशोधक

जनकवाडे शिवानंद तातेराव